# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone: 07172-251965/272410/258062
Fax: 07172-251965
Visit us at www.mpcb.gov.in
E-mail: srochandrapur@mpcb.gov.in

"Your Service is our Duty"

Sub-Regional Office
Udyog Bhavan, Ist Floor,
Railway Station Road,
Chandrapur - 442401


No. MPCB / SROC/ 436 / 2022 Date: 15 / 09 / 2022

To,

The Joint Director (WPC),

M. P. C. Board, Sion (E),

Mumbai-22.

Sub:- Minutes of Environmental Public Hearing in respect of Proposed Project of Mining Project Cluster for Stone Quarries total Extent in the Cluster Total area 99.99 HA (Cluster Area 67.58 HA) located at. Mohada Village, Tal. Wani, Dist. Yavatmal proposed by M/s. Mohada Crusher Owners Association At. Mohada Village, Tal. Wani, Dist. Yavatmal.

Ref:- 1) Board's Office Order No. E-43 of 2022 dated 30/06/2022 regarding Panel.

2) Public Hearing conducted on 13/07/2022 at Project Site, M/s. Mohada Crusher Owners Association At. Mohada Village, Tal. Wani, Dist. Yavatmal.

Sir,

With reference to above cited subject matter, M/s. Mohada Crusher Owners Association At. Mohada Village, Tal. Wani, Dist. Yavatmal had applied to the Board for conducting Environmental Public Hearing for their Proposed Project of Mining Project Cluster for Stone Quarries total Extent in the Cluster Total area 99.99 HA (Cluster Area 67.58 HA) located at M/s. Mohada Crusher Owners Association At. Mohada Village, Tal. Wani, Dist. Yavatmal. The Public Hearing was conducted on 13/07/2022 at Project Site, M/s. Mohada Crusher Owners Association At. Mohada Village, Tal. Wani, Dist. Yavatmal, submitting herewith the copies of proceedings of the Public Hearing as under;

ok

Received
Pramod Waghade

1) Minutes of Public Hearing in English & Marathi (One original Copy & one photocopy).
2) Copy of attendance sheet.
3) Office order for constitution of Public Hearing Panel.
4) Notices of Public Hearing published in English & Marathi Newspapers.
5) Copies of written submissions received regarding project.
6) DVD of video shooting at the time of Public Hearing.
7) Executive Summary (English & Marathi).
8) EIA Report.

This is submitted for your perusal and onward submission.

Thanking you.

Yours Faithfully

(A. P. Satfale)
Sub-Regional Officer, Chandrapur.

Copy submitted for information to:-
1) The District Collector, District Collector Office, Yavatmal.
2) Additional Collector & Sub-Divisional Magistrate, Yavatmal, Tal. Dist. Yavatmal.
3) Regional Officer, M. P. C. Board, Chandrapur.
4) EIC, M. P. C. Board, Mumbai – for display on website of the Board.

Copy for information to:-
M/s. Mohada Crusher Owners Association, At. Mohada Village, Tal. Wani, Dist. Yavatmal.

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मोहदा स्टोन क्वारी असोसिएशन, मोहदा, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ यांच्या प्रस्तावित मोहदा स्टोन क्वारी क्लस्टर एकूण क्षेत्र ९९.९९ हेक्टर (क्लस्टर क्षेत्र-६७.५८ हेक्टर) दगड उत्खनन प्रकल्प एकूण खाणी-६९ उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत-**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १३/०७/२०२२ |
| वेळ | : | दुपारी ११:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, मे. मोहदा क्रशर्स ओनर्स असोशिएशन, मौजा मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ |

**<u>प्रस्तावना:-</u>**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मोहदा स्टोन क्वारी असोसिएशन, मोहदा, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ यांच्या प्रस्तावित मोहदा स्टोन क्वारी क्लस्टर एकूण क्षेत्र ९९.९९ हेक्टर (क्लस्टर क्षेत्र-६७.५८ हेक्टर) दगड उत्खनन प्रकल्प एकूण खाणी-६९ प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना टीओआरसाठी अर्ज सादर केला. तेथील तज्ञ मुल्यांकन समिती ०७/०१/२०२१ रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मोहदा स्टोन क्वारी असोसिएशन, मोहदा, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २५/०४/२०२२ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि. मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी यवतमाळ, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १३ जुलै, २०२२ रोजी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यास मान्यता दिली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १०/०६/२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर

प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर
२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
३) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई -४०० ०२२.
४) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर,
५) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर
६) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ
८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ
९) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ
१०) मुख्य अधिकारी, नगर परिषद, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ,
११) तहसीलदार, तहसील कार्यालय- वणी, जि. यवतमाळ
१२) पंचायत समिती कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ,
१३) ग्रामपंचायत कार्यालय, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ
१४) ग्रामपंचायत कार्यालय, पुसद, ता. वणी, जि. यवतमाळ
१५) ग्रामपंचायत कार्यालय, टुंड्रा, ता. वणी, जि. यवतमाळ
१६) ग्रामपंचायत कार्यालय, कृष्णापूर, ता. वणी, जि. यवतमाळ
१७) ग्रामपंचायत कार्यालय, डोर्ली, ता. वणी, जि. यवतमाळ
१८) ग्रामपंचायत कार्यालय, वेळाबाई, ता. वणी, जि. यवतमाळ

वरिल अनुक्रमांक ०६ ते १८ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-४३/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२२०६३०-एफटीएस-०१२९ दिनांक ३०/०६/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत २३ आक्षेप, सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मोहदा स्टोन क्वारी असोसिएशन, मोहदा, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र यांचे उपरोक्त प्रकल्पातील सभासद यांची संपूर्ण सूची - प्रकल्पाचे नांव, प्रकल्प धारकाचे नावं, गट नंबर, प्रकल्प क्रमांक, प्रकल्पाचे क्षेत्र हेक्टरमध्ये, संपूर्ण पत्ता, याची संपूर्ण सूची सोबत जोडलेली आहे. **[सोबत क्रं. १ (ANNX-"I")]**

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश **[सोबत क्रं. २ (ANNX-"II")]** प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री ललितकुमार वऱ्हाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,

- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी,सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

**१) <u>श्री संतोष कडू शंकरवार, वार्ड क्रं.३, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आमच्या दलित वस्तीतील रस्ता आम्ही कर्ज फेडूनसुध्दा होत नाही. एकाने अतिक्रमण केलेले आहे. ग्रामपंचायतीला देऊनही काहीही होत नाही. सरपंच लक्ष देत नाहीत. ग्रामपंचायतही लक्ष देत नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**२) <u>श्री राहुल सुनील तावडे, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | माझ्या शेतालगत असलेले क्रशर गेले ८-१० वर्षे चालू आहेत. त्यामुळे शेतीलाही प्रचंड त्रास आहे. माझ्या पीकांचे नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे माझ्या आईवडिलांना त्याचा खूप | पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की ही जी जनसुनावणी चालू आहे, ही क्लस्टरसाठी चालू आहे. दोन भागात दगडखाणींना पर्यावरण अनुमती मिळते. पहिली पर्यावरण अनुमती मिळते ती |

| | | |
|---|---|---|
| | त्रास होत असून दवाखाने व औषधोपचार चालू आहे. | क्लस्टरला. ती घेण्याचे कारण छोट्या छोटया-खाणमालकाला ते करणे शक्य नाही, कारण त्याचे छोटे छोटे पॉकेट्स आहेत. केंद्र सरकारने सांगितले की सर्वांची असोसिएशन बनवायची व मोठा कार्यक्रम राबवायचा जो क्लस्टरव्दारे करण्यात येईल. शिवाय वैयक्तिक प्रत्येक खाणीस पर्यावरण अनुमती ही घ्यावीच लागणार आहे. म्हणजे येथे प्रथम क्लसटरची येईल व दुसरी ही वैयक्तिक त्या खदानची. सीएसआर व सीईआर हा फक्त असोशियनचा आहे. २.५ टक्के नफा व सीईआर हा वेगळा जाईल. प्रकल्पात आधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. |

येथे आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना तोंडी आक्षेप नोंदविताना आपले नांव व गाव स्पष्टपणे सांगण्याची सूचना केली.

३) **श्री नागेश विठ्ठल जुन्नरी, कृष्णापूर, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या शेतात धुळ येते. ज्यावेळी स्फोट होतो, त्यावेळी अत्यंत घाण वास येतो. तेथे रहिवाशांना त्यामुळे अस्वस्थ वाटते. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की येथे छोट्या छोट्या खाणी आहेत. तर योग्य पध्दीने समन्वय साधण्यासाठीच त्यासाठीच हा क्लस्टरचा प्रस्ताव तयार केलेला असून जनसुनावणी पध्दत स्विकारली आहे. बरेच खाणमालक हे वेगवेगळ्या प्रकारचे ब्लास्टिंग करतात. येथे असोशिएनतर्फे Control Delay Blasting केले जाईल. ते असोशिएनतर्फे राबविण्यात येईल व खाणमालक जो क्लस्टरचा सभासद आहे, त्यासही ते बंधनकारक राहील. असोशिएनतर्फे एक Regulatory Procedure ची अंमलबजावणी होईल. प्रत्येक खाणमालकाच्या त्याच्या वैयक्तिक पर्यावरण अनुमतीसाठी (Individual Environment Clearance) सुध्दा ती अट राहिल. |

४) **<u>श्री. सचिन वासीकर, उप-सरपंच, मोहदा ग्रामपंचायत, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मोहदा येथे १९८९ पासून ३२ वर्षे पूर्ण झालेली आहेत. गेले ३२ वर्षात मोहदा गावातून सुमारे ४०० कोटी निधी प्राप्त झालेला असून त्याच्या १०% म्हणजे ४० कोटी रुपये आमचे शासनाकडे जमा आहेत. जोपर्यंत ते ४० कोटी रुपये आम्हांला मिळणार नाहित, तोपर्यंत कुठलाही नवीन प्रस्तावास मंजूरी देण्यात येऊ नये. यामध्ये शासनाच्या अटी व शर्तीचे पालन करण्यात आलेले आहे. मोहदा ग्रामपंचायतीस एकूम १९ शेतकऱ्यांची निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्यांना हेक्टरी ५०,००० रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. मोहदा येथे जी उसण होत आहे, त्यामुळे शासनास निधी मिळत आहे. त्यातून आरोग्यासाठी, शिक्षणासाठी ग्रामपंचायतीस निधि मिळणे आवश्यक आहे. जोपर्यंत निधी मिळत नाही, तोपर्यंत कुठलाही नवीन प्रस्तावास मंजूरी देऊ नये ही मोहदा ग्रामपंचायतीचा उपसरपंच म्हणून आपणास विनंती करत आहे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की १०% हा शासनाशी निगडीत आहे. खाणधारक व असोशिएशन रॉयल्टीवर डिएमएफ देतच आहे. |

५) **<u>श्री. खलील शेख, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी क्रशर असोशियनला एक विनंती आहे की ज्या क्रशरला लागून शेत आहे, त्यांच्या रस्त्यासाठी मुरुम, दगड व ज्या आवश्यक वस्तू लागतील, त्याचा त्यांनी पुरवठा करावा. कारण कालच्या पावसामुळे बरेच रस्ते फुटलेले | पर्यावरण सल्लागार यांनी करण्यास हरकत नाही असे मत मांडले. त्यांनी असोशिएनचे_अध्यक्ष यांना उत्तर देण्यास सांगितले.<br>श्री राजूरकर, अध्यक्ष, मोहदा दगड खाण असोसिएशन यांनी सांगितले की शेतालगतच्या |

| | | |
|---|---|---|
| | आहेत. जर स्थानिक शेतकऱ्यांना मुरुम वा इतर वस्तूंची मागणी केल्यास क्रशरवाले सर्रास नकार देतात. तरी माझी विनंती आहे की त्यांनी आमच्या जाण्या-येण्याचे व रस्त्यालगतचे रस्ते त्यांनी दुरुस्त करुन देण्यात यावे. ही आपणास मनःपुर्वक विनंती आहे. | रस्त्याबाबत प्रश्न विचारण्यात आलेला आहे. पूर्वीसुध्दा जे पाणंद रस्ते आहेत, ज्या ज्यावेळी शेतक-यांनी, त्या गावच्या सरपंचांनी पाणंद रस्त्यावर मुरुम टाकण्याची मागणी केली, त्या त्या वेळी खाण मालकांनी मुरुम उपलब्ध करुन दिला व पसरून दिलेला आहे. त्यामुळे मुरुम टाकून देणे हा प्रश्न गौण आहे. भविष्यात जेव्हा गरज असेल, तेव्हा मागणी केल्यास निश्तिच त्याप्रमाणे मुरुम उपलब्ध करुन देण्यात येईल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक यांनी त्याबाबत आश्वासन दिलेले आहे.<br>यावेळी काही उपस्थितांनी केव्हाही दिला नाही असा गलका केला.. श्री राजुरकर यांनी सांगितले नाही टाकला हे म्हणणे चुकीचे आहे. दिला असल्यास त्याची पुरावा देण्यात यावा अशी मागणी उपस्थितांनी केली. त्यावेळी श्री राजुरकर यांनी सांगितले की स्थानिक प्रशासनाने जिथे टाकण्यास सांगितले, त्याठिकाणी टाकलेला आहे. जर आपणास याबाबत खुलासा पाहिजे असल्यास स्थानिक प्रशासन याबाबत खुलासा करतील. यावेळेस उपस्थितांनी नकारात्मक प्रतिक्रिया दिली असता पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की यासाठीच असोसिएशन स्थापन करण्यात आलेले असून सर्व वैधानिक नियमांचे पालन करता येईल. |

६) **श्री संदेश अंबटकर, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी आक्षेप नोंदविला की क्रशरवाले मुरुम देत नाही, तर ते हवेवाटे डस्ट पाठवितात. आम्ही त्यांनी डस्ट बंद करा असे सांगितले की ते म्हणतात तुला काय करायचे ते तू कर. आमच्यावरच ते दादागिरी करतात. तर आम्ही | सूचनेची नोंद घेण्यात आली. उत्तर वरिल क्रं. ५ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | काय करायचे ते सांगा. त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस एक व्हिडिओ सर्व उपस्थितांना दाखविण्याची विनंती केली. त्यांनी विनंती केली आम्ही कोणाच्याही विरुध्द नाही. मात्र जो डस्टमुळे त्रास होत आहे, त्याबाबत उपाययोजना करण्यात याव्यात. | |

७) **श्री किशोर शंकावार, वेळाबाई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरात वाहतुकीचा खूपच ताण पडतो. वणीपासून मोहदाकडे येणा-या रस्त्यावर तीन मार्बल अपघात झाले. त्यात एक महिला मृत्यू पावली व दोन युवक दवाखान्यात आहेत. आता जो मुरुम टाकला, तो चुकीचा पध्दतीने टाकल्यामुळे हे अपघात झालेले आहेत. रस्त्यावर खड्डे आहेतच, पण या खाणीतील ओव्हरलोड ट्रक्समुळे खड्डे हे जास्त प्रमाणात वाढलेले आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की या खाणीतील डस्ट प्रकल्पा सभोवतालच्या शेतातील पिकांवर, कापसावर पडते. त्यामुळे कापूस हा काळा होतो व हेक्टरी आमचे प्रचंड नुकसान होते. आमचे शेतकरी क्रशर मालकांना नुकसानभरपाई विचारण्यास गेले असता, त्यांना हाकलून देण्यात येते. जरी क्रशरला मोहदा ग्रामपंचायत व शासनाने परवानगी दिलेली असेल, तर या डस्टमुळे स्थानिक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. त्याचप्रमाणे हे क्रशर स्थानिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत. येथे सकाळी माठात पाणी झाकून ठेवले तर दुसऱ्या दिवशी त्यावर एक धुळीचा एक थर तयार होतो. तो थर म्हणजे खाणीत स्फोट | गावातील पिण्याच्या पाण्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे. आर.ओ. पाणी तरतुद असोशिएनतर्फे करण्याचा प्रस्ताव आहे. |

| | | |
|---|---|---|
| | बारुदमुळे करतात, ते पाण्यात मिसळतात. मोहद्यात दहा वर्षांपूर्णी पाणी कोठेच लागत नव्हते. खाणीत पाणी साचल्याने ते आले. ग्रामपंचायतीची टाकी रिकामी होती. लोकांचे आरोग्य खराब हे पाण्यामुळे व प्रदूषणामुळे होत आहे. ही परिस्थिती ह्या खाणींमुळे झालेली आहे. लोकांना शुध्द पाणी मिळत नाही. ते पाणी बारुदयुक्त पाणी आहे. ते पिण्यास पाणी येते. अंगवाडी-१ व अंगणवाडी-२ व आशा वर्कर यांच्याकडे आकडे आहेत की कुपोषित, या प्रदूषणामुळे अपंग म्हणून जन्मलेली बालके किती . मोहदा, केशवनगर व जवळील गावात, हे सर्व या प्रदूषणामुळे होत आहे. | |
| ३) | तसेच येथे आमच्याकडे लहान मुले, वृध्द माणसे आहेत. त्यांना या रस्त्यांमुळे अपघात होऊ नये. मधील रस्ते बनविले, पण मुख्य रस्ते यांनी बंद करुन टाकले. हा प्रश्न कोणाचा आहे हे माहित नाही. येथील ब-याच ग्रामपंचायती, सरपंच प्रयत्न करत आहेत. याची काळजी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, याची गांभीर्याने दखल घेण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

८) **<u>श्री संतोष शंकरवार, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथील एक खाण प्रदूषण करत असल्याने, त्रास देत असल्याने बंद करण्यात आली, मात्र पंधरा दिवसात कशी चालू करण्यात आली? | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**ऑनलाईन वर उपस्थित असणाऱ्यांना** आयोजक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

९) **श्री वासुदेव विधाते हे ऑनलाईन उपस्थित होते –**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | त्यांनी प्रश्न विचारला की ज्या खाणी होणार आहेत, त्या १८ मीटर्स खोलीच्या होणार आहेत. तर भविष्यात ह्या खाणी बंद करण्याचा प्रस्तावित योजना (Proposed Closure Plan of Mines) सादरीकरणात दर्शविण्यात आलेला नाही. तर भविष्यात या खाणी बंद करण्याचे काय नियम आहेत? जवळजवळ ६० फुटी या खाणी खोल असणार आहेत. त्यात पाणी साचल्याने इतरही प्रश्न निर्माण होतात. जीवितहानीसुध्दा झालेली आहे. ब-याचवेळी जनावरांचेही मृत्यू खाणीत पडल्याने झालेले आहेत. तरी मॉइन्स विशिष्ट कालावधीनंतर बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. प्रकल्प प्रवर्तकांनी आखलेली योजना ही सर्वांना समजली पाहिजे. त्यांनी पर्याय म्हणून मासेमारीबाबत गावकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल असे जरीही सांगितले असले, तरी तो पुढचा भाग आहे. | **श्री विधाते ऑनलाईन प्रश्न होता मॉइन्स क्लोझरविषयी.** १२ जानेवारी, २०१८ चे महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार ज्या मायनर मिनर्लसच्या खाणी आहेत, त्या पाणी साठवण करण्यासाठी तलाव करण्यात यावा. तशी उपाययोजना करण्यात यावी. त्याचप्रमाणे शेवटचा मायनिंग क्लोझर प्लॅन हा [संचालक, भूगर्भशास्त्र (खाण) Director, Geology Mining] यांच्याकडून मायनिंग क्लोझर प्लॅन मंजूर करण्यात यावा. उपाययोजना करुन त्याचा अहवाल जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना सादर करण्यात यावा. आपल्याकडे गट नं. ७५ हा सरकारी गट आहे. तेथे खाणमालकांचा प्रत्यक्षात सहभाग नाही. तर जेथे मिनरल मॉइन्स आहेत, तेथे फायनल क्लोझर प्लॅन/ शेवटचा मायनिंग क्लोझर प्लॅन हा [संचालक, भूगर्भशास्त्र (खाण) Director, Geology Mining] हा संचालक, यांच्याकडून मंजूर करण्यात येईल. |
| २) | आयोजक यांनी पुन्हा ऑनलाईन उपस्थितांना कोणाचे प्रश्न असल्यास ते उपस्थित करण्याची सूचना केली. त्यावेळी श्री विधाते यांना प्रश्न उपस्थित केला की प्रकल्प प्रवर्तकांना सीएसआर निधी अंतर्गत स्थानिकांना मासेमारीबाबत प्रशिक्षण व व्यवस्था उपलब्ध करण्याची जरी हमी दिलेली आहे, मात्र किती | **त्यांनी सांगितले की जेथे** फायनल क्लोझर प्लॅन/ शेवटचा मायनिंग क्लोझर प्लॅन आहे, तेथे वॉटर सम्प तयार करुन [संचालक, भूगर्भशास्त्र (खाण) Director, Geology Mining] यांच्याकडून मायनिंग क्लोझर प्लॅन मंजूर करण्यात येईल. श्री विधाते यांनी मासेमारीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तर आम्ही नियोजन करताना विचार केला की |

| | | |
|---|---|---|
| | लोकांना, किती गावात प्रशिक्षण देणार व त्या मासेमारीचा मालकी हक्क कोणाकडे राहिल याबाबत काहीही उल्लेख नाही. याबाबतीत प्रकल्प प्रवर्तकांनी काही अभ्यास वा सर्वेक्षण केले आहे का? असल्यास त्याबाबत आकडेवारी उपलब्ध करण्यात यावी. जर त्याचप्रमाणे पंचवीस हजार निधी राखीव ठेवणार असतील तर तो अपुरा वाटतो. जी काही योजना आहे, ती सर्वांनाच कळणे आवश्यक आहे. | तेथे मोठी शासकीय बंद झालेली खाण आहे. तर तेथे मासेमारी व्यवस्था अवलंबिण्यात येऊ शकते. येथे मासेमारीचे प्रशिक्षण हा विचार केलेला असून त्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे. प्रत्येक खाणीचा जो सीईआर निधी आहे, त्यातून हा खर्च करता येणार आहे. असोसिएशन ही जनजागृती करेल, तर वैयक्तिक खाणी निधी शासन नियमाप्रमाणे जिल्ह्याला दिलेला आहे. |
| ३)<br><br><br>अ) | श्री विधाते यांनी पुढे आक्षेप नोंदविला की ह्या मॉइन्स भाडेतत्वावरील आहेत. तर मग याबाबत खालील मुद्दे उपस्थित होतात-<br>फिशरींजचा हक्क कोणाकडे राहील? | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ब) | त्या मॉईन्स पॉन्डचा हक्क कोणाकडे राहील? कारण खाणीसुध्दा बऱ्याच आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| क) | परिसरात वन्यजीवांचा अधिवास दिसलेला आहे. शिवाय वाघांचा अधिवास, अस्तित्व, वाघांची हालचाल असल्याचे पुरावे सापडलेले आहेत. तर येथे संबंधित वन्यजीव विभाग - Wild Life Department, Govt. of India यांच्याकडून ना हरकत दाखला घेतलेला नाही. | वन्य विभागाकडून ना हरकत दाखल्याची आवश्यकता नाही. |
| ड) | त्याचप्रमाणे सदरहू वन्य जीव व वाघांचा अधिवास, अस्तित्व, वाघांची हालचाल या भागात आहे व त्याबाबतचा ना हरकत दाखला याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व सादरीकरण यात उल्लेख नाही. | |
| इ) | जनावरांवर व माणसांवर वन्यजीवांकडून हल्ले झालेले आहेत याबाबत अहवालात उल्लेख नाही. येथे संबंधित वन्यजीव विभाग -Wild Life Department, Govt. of India यांच्याकडून ना हरकत दाखला घेतलेला नाही. | |
| ई) | तर ह्या परवान्यांसाठी त्यांनी अर्ज सादर केला का, ते परवाना घेणार आहेत का, परवाना किती | |

| | | |
|---|---|---|
| | दिवसात व किती अवधीचा मिळेल याबाबत काहीही उल्लेख अहवालात नाही. येथे Environment (Protection) Act, १९८६ and Wild Life Act यांचे उल्लंघन झालेले आहे. | |
| उ) | त्याचप्रमाणे खाण परिसरात वृक्षारोपण व हरितपट्टा विकास केलेले नाही. तसेच येथे हरितपट्टा विकासाचे क्षेत्र वाढविणे आवश्यक आहे. | |
| ऊ) | येथे सुरक्षा क्षेत्र (Safety Zone) २०० मीटर्स अंतर करण्यात आलेले आहे. खाणकाम करताना ड्रिलिंग होल्स, ब्लास्टींग (Controlled Delayed Blasting), क्रशिंग, खनिजांची वाहतुक हे उपक्रम होणार. तर त्यासाठी २०० मीटर्स सुरक्षा क्षेत्र हे कमी व विनासायास अपघातास आमंत्रण करणारे आहे. त्याचप्रमाणे तेथे आजूबाजूला शेतीचे क्षेत्र असून तेथील शेतात पीके काढली जातात, त्यामुळे तेथे शेतक-यांची, जनावरांची वर्दळ असून शकते. तरी येथे ५०० मीटर्सचे सुरक्षा क्षेत्र (Safety Zone) असायला हवे. तो लोकांच्या व शेतातील पीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे. | सुरक्षा क्षेत्र (Safety Zone) हा महाराष्ट्र मायनिंग कायद्यानुसार २०० मीटर्सचा आहे. तो कायद्यानुसार असल्याने ५०० मीटर्स करण्याची तरतुद नाही. |
| अं) | त्याचप्रमाणे खाण क्षेत्राजवळून राज्य महामार्ग जातो. खाणीमध्ये ब्लास्टींग होणार. तर राज्य महामार्गावरुन जाणाऱ्या वाहतुकीसंदर्भात व सुरक्षेबाबत अहवालात काहीही उल्लेख नाही. त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक-मोहदा स्टोन क्वारी असोशिएशन यांनी दिलेली आश्वासने ही हास्यास्पद आहे. तर या प्रश्नांची उत्तरे प्रकल्प प्रवर्तकांकडून मिळाली. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१०) <u>श्री आशिष फुलसुंगे, गणेशपूर खडकी, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | श्री आशीश फुलसंगे यांचे प्रश्न होते- रस्ते परिस्थितीवर. हा विषय डिएमएफ मधून सोडविता येऊ शकतो. | अध्यक्ष, क्रशर असोशिएशन हासुध्दा विषय सोडवतील. यावेळी श्री फुलसंगे यांनी आक्षेप नोंदविला की क्रशर असोशिएशनच्या अध्यक्षांनी सांगितले तर डिएमएफ निधी मिळत नसतो |
| २) | त्यांनी आक्षेप नोंदविला सीएसआर निधींतर्गत प्रकल्प प्रवर्तकांने किती आरोग्य शिबिरे भरवली, तर एकही नाही. ते म्हणाले की गावातील लोकांना कंपनीने असे सांगितले की आर.ओ. प्लँट गावकऱ्यांसाठी देण्यात येईल. तर गेले अनेक वर्षे का करण्यात आला नाही? तर प्रकल्प प्रवर्तक यांनी जी आश्वासने पाळण्याची हमी दिलेला आहे, ते प्रथम पूर्ण केल्याशिवाय सदरहू प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये. रस्त्याशिवाय येथे खरे पाहता दुसरा कुठलाची विषय महत्वाचा नाही.<br>आज पाहणीत आढळून आले की झाडे लावण्याची जबाबदारी ही टाळलेली गेली आहे. आज मी पाहिले की जेथे शक्य तेथे झाडे लावण्यात आलेली नाही. यांनी खाणीपरिसरात झाडे लावण्यासाठी जागा तरी ठेवली आहे काय? कारण हे खाणकाम त्यांच्या हद्दीपर्यंत करतात. जर येथे एवढे प्रदूषण गेले दहा वर्षे होत आहेत, तर प्रकल्प प्रवर्तकांनी किती झाडे लावली, किती जगली व कोणत्या प्रकारची झाडे लावली याची माहिती द्यावी. | त्यावेळी श्री राजुरकर यांनी माहिती दिली की श्री फुलसंगे यांनी मांडलेल्या विचारांनुसार राज्य रस्ते हे डीएमएफ निधींतर्गत घेता येत नाही. या भागातील आमदार यांच्याची या विषयावर ब-याचवेळा चर्चा झालेली असून केंद्र सरकारकडून आलेला निधी व राज्य सरकारकडून आलेला निधी यातून रस्ता विकसित करता येतो. येथील खासदारांशी चर्चा झाली आणि जर रस्ते होत नसतील तर आंदोलन करावे लागले असे त्यांचे मत पडले. त्यावेळी श्री फुलसंगे यांनी मत मांडले येथील सामान्य नागरिकांना त्यामुळे प्रचंड त्रास होत आहे. मुकुटबन येथील शाळेची बस बंद पडलेली आहे. त्यावेळी श्री फुलसंगे यांनी मागणी केली की जोपर्यंत हे रस्ते होत नाहीत, तोपर्यंत सर्व खाणी ह्या बंद करण्यात याव्यात. श्री राजुरकर यांनी माहिती दिली की जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना एक प्रतिनिधी मायनर मिनरलमधून घ्यावा अशी मागणी केलेली होती. त्यामुळे मोहदा गावाला काही शासकीय निधी आणता आला असता. पण मा. जिल्हाधिकारी यांनी ही मागणी फेटाळली आणि दोन्ही प्रतिनिधी हे मेजर मिनरल संवर्गातून घेतले. |
| ३) | श्री फुलसंगे यांनी मत मांडले की जर आंदोलन करावे लागत असेल, तर ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी व रस्ते चांगले झाल्यानंतर परत सहा महिन्यांनी घेण्यात यावी. श्री फुलसंगे | |

| | | |
|---|---|---|
| | यांनी मत मांडले की जर आंदोलन करावे लागत असेल, तर ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी व रस्ते चांगले झाल्यानंतर परत सहा महिन्यांनी घेण्यात यावी. श्री फुलसुंगे यांनी मागणी केली की येथेच मा. जिल्हाधिकारी यांना येथे निवेदन देऊ. आठ दिवसात काही झाले नाही तर आंदोलन सुरु करु, तोपर्यंत सर्व खदानी बंद ठेवण्यात याव्यात. रस्ते दुरुस्त झाल्यानंतरच खाणी चालू करण्यात याव्यात. | |
| ४) | येथे बैठकीस आलेल्या अधिकाऱ्यांनी येताना रस्त्याची परिस्थिती बघितली असेल. तर ही परिस्थिती आजूबाजूस झालेल्या खाणींमुळे झालेली आहे. १५ वर्षांपूर्वी येथे १-२ खाणी होत्या. तेव्हा एवढे रस्ते खराब झालेले नसायचे. येथे दिसून येते की या क्रशर्सवाल्यांनी परिसरात काय विकास केला?<br>त्यांनी सांगितले की या परिसरातील खाणींनी जी रॉयल्टी मिळून दिली व जो खाणनिधी जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीत असतो, त्याचप्रमाणे विविध खाणींमुळे प्रकल्प प्रवर्तक यांच्याकडे असलेला सीएसआर निधी असूनही येथे रस्ते दुरुस्त करण्यात येत नाहीत. येथे १०,००० पेक्षा जास्त लोक राहत असून या खाणींमुळे या परिसराचा सत्यानाश झालेला आहे. येथील खाणीतील ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्ते पूर्णपणे फुटलेले आहेत. या रस्त्यांची क्षमता नसताना अशी ओव्हरलोड वाहतुक खाणींमुळे होत असते, या खाणी लोकांच्या जीवाशी खेळत आहेत. रस्ते खराब असल्याने बसेस बंद झालेल्या आहेत. तरी ही जनसुनावणी त्वरित स्थगित करण्यात येऊन इकडील रस्ते दुरुस्त झाल्यानंतर परत आयोजित करण्यात यावी. तरी ही सुनावणी ही | त्यावेळी श्री राजुरकर यांनी माहिती दिली की श्री फुलसंगे यांनी मांडलेल्या विचारांनुसार राज्य रस्ते हे डीएमएफ निधींतर्गत घेता येत नाही. या भागातील आमदार यांच्याची या विषयावर ब-याचवेळा चर्चा झालेली असून केंद्र सरकारकडून आलेला निधी व राज्य सरकारकडून आलेला निधी यातून रस्ता विकसित करता येतो. येथील खासदारांशी चर्चा झाली आणि जर रस्ते होत नसतील तर आंदोलन करावे लागले असे त्यांचे मत पडले. त्यावेळी श्री फुलसंगे यांनी मत मांडले येथील सामान्य नागरिकांना त्यामुळे प्रचंड त्रास होत आहे. मुकुटबन येथील शाळेची बस बंद पडलेली आहे. त्यावेळी श्री फुलसंगे यांनी मागणी केली की जोपर्यंत हे रस्ते होत नाहीत, तोपर्यंत सर्व खाणी ह्या बंद करण्यात याव्यात. श्री राजुरकर यांनी माहिती दिली मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना एक प्रतिनिधी मायनर मिनरलमधून घ्यावा अशी मागणी केलेली होती. त्यामुळे मोहदा गावाला काही शासकीय निधी आणता आला असता. पण मा. जिल्हाधिकारी यांनी ही मागणी फेटाळली आणि दोन्ही प्रतिनिधी हे मेजर मिनरल संवर्गातून घेतले. |

| | | |
|---|---|---|
| | त्वरित स्थगित करण्यात येऊन नंतर परत नवीन आयोजित करण्यात यावी. येथे बंद खाणीत पाणी साचलेले असून अपघात व जीवित हानी झालेली आहे. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की झाडे लावण्याचा विषय निघालेला आहे. आता पावसाळा आहे. नाही तर येथून मोहदा, टुंड्रा, वेळावे येथेपर्यंत धुळ राहते. | |
| ५) | अहवालात माहिती दिलेली आहे की हे शेतकऱ्यांना मदत करणार. तर खाणीमुळे परिसरातील जी पाण्याची पातळी खालावली आहे, त्यासाठी किती शेतकऱ्यांना प्रकल्प अधिकारी यांनी बोअरवेल काढून दिलेल्या आहेत. आजूबाजूच्या शेतीचे नुकसान होते, तर आजूबाजूच्या किती शेतकऱ्यांना ते मोबदला देत आहेत? कमीतकमी २५,००० रुपये एकरी देण्यात यावेत. याची संपूर्ण माहिती देणे अपेक्षित होते. | सीएसआर निधीतर्गत शुध्द पाण्यासाठी गावाला रिव्हर्स ऑस्मोसिस ही प्रणाली पुरविण्यात येईल. |
| ६) | प्रकल्प प्रवर्तक स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी देत नाही. परराज्यातील लोकांना नोकरीची संधी देण्यात येते. शासनाने ८०% रोजगार हा स्थानिकांना देण्याच्या आदेशाचे उल्लंघन करण्यात येत आहे. येथे स्थानिक युवक बेरोजगार बैठकीस आलेले आहेत. त्यांना नोकरीची आशा आहे. तर जे खाणीत कार्यरत आहेत, त्यांच्याबाबत काहीही सुरक्षा व्यवस्था नाही. माझ्या माहितीप्रमाणे अगदी प्राथमिक सुरक्षा उपकरणेसुध्दा पुरविली जात नाहीत. जर सुरक्षा उपकरणे पुरविण्याच्या नियमांचे उल्लंघन करत असतील, तर या सर्व खाणी बेकायदेशीर आहेत. | |
| ७) | त्यांनी आक्षेप नोंदविताना मागणी केली की आमच्या सर्व मागण्या पूर्ण झाल्याशिवाय पुढील मंजूरी देण्यात येऊ नये. तसेच प्रकल्पात | |

| | | |
|---|---|---|
| | काम करणाऱ्यांना किती वेतन देण्यात येते, शासनाच्या नियमाप्रमाणे पगार दिला जातो का, याबाबत लक्ष देणे गरजेचे आहे. | |
| ८) | रस्त्याला लागून असलेली खाण काही दिवसांपूर्वी बंद होती, तर आता परत कशी चालू केली याचेही स्पष्टीकरण देण्यात यावे. कारण २०० मीटर्स सुरक्षा अंतर असेल तर ५०० मीटर्स सुरक्षा अंतर सांगतात, तर रस्त्यापासून दहा फूटसुध्दा अंतर नसलेल्या खाणी कशी चालू करण्यात येतात याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे? तरी माझी शासनास विनंती आहे की सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय कुठल्याही खाणीस मान्यता देण्यात येऊ नये. सदरहू जनसुनावणी ही येथेच थांबवावी व मागण्या पूर्ण झाल्यानंतर परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. | महाराष्ट्र शासनाने |

११) **श्री रामकृष्ण उईके, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी आक्षेप नोंदविला की रोडला लागूनच खाण आहे, ती जव्हेरी यांची खाण आम्ही आमसभेत बंद करण्याची मागणी केली. ती बंद करण्यात आली, मात्र मासिक सभेत ती परत चालू करण्यात आली. त्यांनी आक्षेप नोंदविला की आम्ही ग्रामपंचायत कर भरतो, पाण्याचा व वीजेचा कर भरतो. पण आम्हांला साधी दिवाबत्तीची सोय नाही. आम्ही वीज पुरवठा मागितला तर तो नाकारण्यात आला. मग आम्ही कर का भरावा? | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१२) **श्री बळीराम लक्ष्मण वांदरे, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या घरावर गोटे येऊन पडतात. याची कोणीही दक्षता घेत नाही. आम्हांला माहित नसते की ब्लास्टींग केव्हा होणार? आमची मुलेबाळे आहेत, त्याची जबाबदारी तुम्ही घेणार काय? | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१३) **श्री रविंद्र पुसाटे, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी सूचना केली आपल्या गावात एवढे क्रशर आहेत. मात्र तेथे स्थानिक कामगार कमी असून इतर राज्यातील जास्त आहेत. असे का? स्थानिक लोकांसाठी जास्त रोजगार पाहिजे.<br>श्री रविंद्र पुसाटे यांनी पुढे सांगितले की मी या बैठकीत बहिष्कार टाकतो कारण प्रदूषणाची पातळी समजण्यासाठी सदरहू कार्यक्रम हा उन्हाळ्यात घेणे गरजेचे होते. म्हणजे डस्टचे किती प्रदूषण होते हे सर्वांनाच कळले असते. या बैठकीसाठी येथील क्रशर बंद करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे इतर राज्यातील लोकांना रोजगार देऊन येथील स्थानिक लोकांवर अन्याय करत आहेत.<br>त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की १२ तास काम करुन फक्त आठ तासांचा पगार दिला जातो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | मी अध्यक्षांना मागणी करतो की येथे स्थानिक लोक आहेत, जिल्हाधिकारी आहेत व खाण मालक आहेत. तर आता आपण खाणीत जाऊन किती झाडे लावलेली आहेत ते तपासू. | अध्यक्ष यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांना अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ३) | येथे **श्री रविंद्र पुसाटे, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ यांनी** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस प्रश्न विचारला की येथे खाण मालकांची संघटना आहे. तर खाण कामगारांची संघटना का नाही? याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. आम्हांला खाण कामगारांची संघटना पाहिजे. पाहिजे म्हणजे पाहिजे. कामगार हे मालक लोकांना कमावून देतात. आम्ही भीमाचे लेकरु आहोत. खाण कामगारांची संघटना का नाही? | |

**१४) श्री संदेश अंबरकर, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावात राजकारण चालते. येथे बरेच बेरोजगार आहेत. येथे आलेले स्थानिक कामगार काहीही बोलू शकत नाही. कारण ते दबावाखाली आहेत. उद्या नोकरीवरुन काढेल किंवा पगार अर्धा करेल. काही अशिक्षित आहेत. तर आता क्रशर असोशिएसनला स्थानिकांना काय सुविधा पुरविणार हयाची माहिती देण्यास सांगावे. त्यांनी सांगितले की आमच्या समस्या जाणण्यासाठी शासन आलेले आहे. क्रशर असोशिएनच्या लोकांची माणसे आमच्यावर दादागिरी करत आहे. त्यांचे मॅनेजरच आम्हांला हाकलून देते, आमचा मालक कोण आहे हेही आम्हांला माहित नाही. तर यावर काय उपाय होईल? | |
| २) | यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती बैठकीत उपस्थितांना आवाहन केले की कुठल्याही दबावाखाली न येता निर्भयपणे आपले प्रश्न, आक्षेप संबंधित प्रकल्पाविषयी मांडण्यात यावेत. सर्व | |

| | | |
|---|---|---|
| | उपस्थितांनी टाळ्या वाजवून याचे स्वागत केले. | |

**१५) श्री विजय पिदूरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी मोहदा दगड खाण सामुहिक प्रकल्पामुळे जे काही उत्खनन प्रक्रिया, चढ उतार, वाहतुक होईल व त्यामुळे होणारी पुढील वाहतुक व्यवस्था व त्यामुळे जे काही हवा, पाणी, मृदा, पशूपक्षी इत्यांदीवर जो संभाव्य दुष्परिणाम होणार आहे, त्याबाबत लेखी निवेदन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिलेले आहे.<br>श्री विजय पिदूरकर यांनी लेखी निवेदन वाचताना सांगितले की | |
| २) | मोहदा दगडखाण प्रकल्प किती हेक्टर क्षेत्रात उभारणार आहेत? ईआयए अहवाल व कार्यकारी सारांश यात दिलेल्या माहिती तफावत आहे. ईआयए अहवाल दर्शविलेले प्रकल्पाचे हेक्टर कार्यकारी सारांश अहवालात कमी दाखविलेले आहे. त्याचे स्पष्टीकरण येथे दिले पाहिजे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू अहवाल हा प्रारुप असून शासनास अंतिम अहवाल सादर करताना सर्व त्रुटी ह्या दुरुस्त करण्यात येतील. |
| ३) | या प्रकल्पाचे भांडवली अंदाजपत्रक किती आहे? यात सहभाग खाणमालकांच्या भांडवलाचे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. | |
| ४) | या उपक्रमामुळे आजूबाजूच्या गावात समस्या निर्माण झाल्यास याला जबाबदार कोंण याबाबत स्पष्टीकरण हे शासनातर्फे देण्यात यावे. म्हणजे क्लस्टर असोशियनच्या अध्यक्षांना बोलावयाचे की संबंधित खाण मालकास बोलवावयाचे याचे स्पष्टीकरण | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | या मोहदा प्रकल्पात १,६०० रोजगार देण्याचे आपण कार्यकारी सारांश अहवाल व पर्यावरण | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले प्रस्तावित प्रकल्पात 1600 व्यक्तींना रोजगार मिळू शकतो, |

| | | |
|---|---|---|
| | आघात मुल्यांकन अहवालात लिहिलेले आहे. यात कामगारांच्या संवर्गाचे स्पष्टीकरण नाही, म्हणजे अकुशल, अर्धकुशल व अतिकुशल कामगार किती घेणार याबाबत स्पष्टीकरण नाही. ते होणे गरजेचे आहे. | त्यातील 200 व्यक्ती ही कुशल संवर्गातील लागतील. |
| ६) | तसेच संबंधित कामगारांसाठी क्लस्टरची रोजगार नियुक्तीबाबत वेगळे धोरण आहे काय? याचे स्पष्टीकरण. | |
| ७) | उत्पादनासाठी किती जमीन राखीव ठेवण्यात येणार आहे? | |
| ८) | प्रकल्पात झाडे किती लावणार व ते प्रकल्पाच्या सभोवताली लावणार का याचे स्पष्टीकरण. हरितपट्टा व वृक्षलागवड यांची जबाबदारी खाणमालक सामुहिकपणे घेणार का?<br>या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे, गावातील जमिनीचे, पशूपक्षांचे नुकसान होणार आहे. ईआयेए अधिसूचनेनुसार प्रकल्पग्रस्त गावात तरुण, तरुणी, महिला यांचे शैक्षणिक अहर्ता, बेरोजगार याबाबत सर्वेक्षण केलेले आहे काय? ही यादी ईआयए अहवालात दिलेली नाही. याबाबत स्पष्टीकरण. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की असोशिएशनतर्फे 7,500 झाडे लावण्यात येतील. |
| ९) | खाणमालकांकडून पर्यावरण संवर्धनासाठी काही स्वतःचे उपाययोजना राबविण्यात येणार काय याबाबत स्पष्टीकरण. | प्रत्येक खाणमालकास पर्यावरण संवर्धनासाठी उपाय योजना कराव्या लागतील. |
| १०) | या उत्खननामुळे क्षतिग्रस्त भागाचे नुकसान होते, याची भरपाई संदर्भात कारवाई झाली पाहिजे. सततचे उत्खनन, विस्फोट व माल भरणे यामुळे धुळ प्रदूषण, दम्याचा आजार, त्वचा रोग, विशेष करुन मोहदा गावात मुतखडयाचा आजार झालेला होता,कारण सल्फर, कॅल्शियम चे प्रमाण त्या भुकटीत जास्त आहे. त्यामुळे त्या गरीब कामगार/शेतकरी यास २ ते ५ लाख रुपये खर्च | |

| | | |
|---|---|---|
| | होतो. तर आरोग्यासाठी उपाययोजनांचा उल्लेख ईआयए अहवालात नाही. नागपुरच्या Enviro या संस्थेने जे काही सर्वेक्षण व अहवाल बनविला, तो अत्यंत बेजबाबदारपणे तयार केलेला आहे. | |
| ११) | येथे जनसुनावणीत पर्यावरण दुष्परिणामाबाबत चर्चा नाही. कारण पर्यावरण आघात मुल्यांकन म्हणजे जे सर्वेक्षण करणार आहेत, ते शास्त्रशुध्द वैज्ञानिक पध्दतीने झाले पाहिजे. यात जो आघात सामाजिक, शास्त्रीय व इतर घटकांचा होणार आहे, तो अंतर्भूत होणे गरजेचे आहे. जर तो अभ्यास, सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने केला असेल, तर पर्यावरण सल्लागाराविरुध्द ४२० चा गुन्हा नोंदविण्यात आला पाहिजे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हा प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाला असून अंतिम अहवालात सर्व त्रुटी दुरुस्त करण्यात येतील. |
| १२) | मोहदा वेळापूर राज्य मार्गावरुन भारक्षमतेनुसार मालवाहतुक करणे गरजेचे आहे. आता तो राज्यमार्ग असल्याने त्याची भारक्षमता ही २५ टन एवढी आहे. येथे खाणमालक, जिल्हा खनिजकर्म अधिकारी व जिल्हा प्रशासनातर्फे अपर जिल्हाधिकारी हे उपस्थित आहेत. खाणीतून वाहतुकव्दारे जाणार माल ज्या रस्त्यावरुन जातो, तो रस्ता खाणीतील मालवजन क्षमतेचा आहे काय हे प्रथम पहावे लागेल. ते नसल्यामुळे रस्त्यात खड्डे पडून लोकांचे जीव गेलेले आहेत. यास जबाबदार सार्वजनिक बांधकाम खाते वा खाणमालक वा म.प्र.नि.मंडळ वा जिल्हा खनीकर्म अधिकारी ह्यापैकी कोण जबाबदार आहे याचा खुलासा होणे गरजेचे आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १३) | मोहोदाच्या वतीने ४०० कोटींची रॉयल्टी व जिल्हा खनीज निधी देण्यात आलेला आहे. आपल्याकडे पंतप्रधान खनिज विकास प्रतिष्ठान तर्फे जिल्हास्तरावर आले असेल, तर | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | येथे ५० टनाची भारक्षमता करणाऱ्या रस्त्याची आखणी करणे गरजेचे आहे. येथील रस्त्याची स्थिती अत्यंत भयानक आहे, अनेक महिलांनी रस्त्यात नवजात शिशूंना जन्म दिला ही लाजीरवाणी गोष्ट आहे. | |
| १४) | मोहोदा गावातील खाणींची रॉयल्टी कागदावर दिसत आहे. तर एवढी रॉयल्टी जर शासनास मिळत असेल, तर ४०० कोटीचे ४०० कोटी या गावास द्यायला पाहिजे. एवढे पैसे या गावातून मिळत असून शासनास पाणी, वीज, आरोग्य, रस्ते, अपंग व जेष्ठ नागरिकांसाठी सारखी पत्रे सादर करावी लागतात, हे दुर्दैव आहे. | |
| १५) | याठिकाणी रस्त्याची तांत्रिक बाब लोकांना सांगण्यासाठी येथे सार्वजनिक बांधकाम खात्यातील तांत्रिक अधिकारी उपस्थित राहणे आवश्यक होते. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १६) | केंद्र सरकारच्या नवीन धोरणांनुसार पाच कि.मी. च्या त्रिज्येच्या आतच पैसे खर्च झाले पाहिजे. मोहदा गावाला त्यानुसारच निधी मिळाला पाहिजे. अजूनही निधी शिल्लक आहे. तर १००% वाटा हा मोहदा, वेळापूर, टुंड्रा या सर्व गावांना मिळाला पाहिजे. तशी तरतुद पंतप्रधान खनिज विकास प्रतिष्ठानमध्ये असतानाही आमच्या गावांना दूर ठेवण्यात येत आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १७) | जुन्या खाणीतून किती रॉयल्टी मिळाली, याचा खुलासा येथे करण्यात यावा. त्यानुसार आम्हांला परतावा देऊ शकले काय याचीही माहिती देण्यात यावी. | |
| १८) | जो सीएसआर क्लस्टरच्या वतीने दाखविण्यात आलेला आहे, तर सीएसआरच्या तरतुदींनुसार लाभाच्या २% तर सीईआर भांडवलाच्या २% दाखविण्यात आलेला आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | श्री विजय पिदूरकर यांनी केंद्रशासनाने पारित केलेल्या ईआयए अधिसूचनेचे पालन करण्यात यावे अशी सूचना केली. त्यांनी पुढे सांगितले की शासकीय व मप्रनि मंडळ अधिकारी यांनी राजपत्राबाबत मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. | |
| १९) | श्री पिदूरकर यांनी सीएसआर व सीईआर निधीबाबत दिलेले आकडे चुकीचे आहेत असा आक्षेप घेतला. त्यांनी सांगितले की ईआयए अहवालात शंभर एकर वर शंभर एकर उत्खनन दाखविलेले आहे. याचा अर्थ ईआयए अहवाल तयार करताना पर्यावरण सल्लागार यांनी भान ठेवलेले नाही. या दोन्ही गोष्टींचा येथे खुलासा होणे गरजेचे आहे. | |
| २०) | श्री पिदूरकर यांनी बंद झालेल्या खाणींवर किती झाडे लावणार याची माहिती देण्याची सूचना केली. | |
| २१) | त्यांनी हवेच्या गुणवता संदर्भात काय उपाययोजना राबविण्यात येतील त्याची माहिती देण्यात यावी. पर्यावरण सल्लागार यांनी दिशाभूल करणारी खोटी माहिती ईआयए अहवालात दिली. त्यासाठी पर्यावरण अधिसूचनेनुसार त्या सल्लागारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. | |

**१६) श्री राहुल सुनिल पावडे, मोहदा, तालुका-वणी,जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज मोहदा दगडखाण सामुहिक प्रकल्पासाठी जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तर प्रथम आमच्या गावाच्या समस्यांचे निवारण होणे गरजेचे आहे. वणी गावातील रस्ते एवढे खराब आहेत की एखाद्या व्यक्तीस | |

| | | |
|---|---|---|
| | आरोग्याचा त्रास असेल, तर दहा-पंधरा मिनिटांच्या प्रवासासाठी दोन तास लागतात. तो रस्त्यातच मरतो. गेले १०-१५ वर्षे त्याबाबत काहीच झालेले नाही. खाणीतील ओव्हरलोड ट्रक्सच्या वाहतुकीमुळे सर्व रस्ते हे पूर्णपणे खराब झालेले आहेत. जर ही जनसुनावणी गावातील समस्यांचा प्रथम विचार करुन उपाययोजना करत नसेल, तर या जनसुनावणीस आमचा विरोध आहे. | |
| २) | त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की आतापर्यंत क्रशर मालकांनी गावात काहीही सुविधा दिलेली नाही. सर्वात जास्त बेरोजगार हे आमच्या गावात आहेत. ग्रामपंचायत आमच्या समस्यांचें निवारण करत नाही. आम्हांला जगणे मुश्किल झालेले आहे. तरी प्रथम आमच्या समस्यांचे निवारण करा, नंतर ही जनसुनावणी दोन-चार महिन्यांनी परत आयोजित करण्यात यावी ही माझा व गावकऱ्यांची विनंती आहे. | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |

**१७) <u>श्री यादव उईके, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मोहदा गावातील लोकांनी आपले विषय मांडले मग ते शेती, पर्यावरण किंवा डस्ट असो. खाणीच्या सभोवती जी जी गावे आहेत, तेथील प्रत्येक गावात अडचणी आहेत. जे लोक भूमीहीन, सुशिक्षित बेरोजगार आहेत, ज्यांची कोरडवाहू शेती आहे, तरुण सुशिक्षित आहेत, त्यांना लग्नासाठी मुली देत नाहीत. बऱ्याच तरुणांना रोजगार नसल्याने गाव सोडून मुंबई, नागपूरला जाऊन मिळेल ती नोकरी किंवा मिळेल ते काम करावे लागते. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | पण या खाणींचा आम्हांला काहीही फायदा झालेला नाही. | |
| २) | मात्र मी क्रशर एसोशियनला धन्यवाद देतो की त्यांनी आमचे गाव प्रकल्पासाठी निवडले. ग्रामपंचायतीने व क्रशर संघटनेने संयुक्तिक योजना त्वरित तयार करुन स्थानिक अशिक्षित आणि सुशिक्षित, शिवाय कुशल, अर्धकुशल बेरोजगारांना विविध खाणी प्रकल्पात कसे सामाऊन घेता येईल असा कार्यक्रम गावागावातून हाती घ्यावा. त्यासाठी विविध गावात प्रशिक्षण योजना हाती घेण्यात यावी. कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेण्यात यावा. श्री यादव उईके यांनी मागणी केली की याबाबत शासन, जिल्हापरिषद यांनी पुढाकार घ्यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | त्यांनी पुढे सांगितले की कुशल, अर्धकुशल याचे वर्गीकरण करुन कुशल व्यक्तींना कुशल संवर्गात नोकरीची संधी देण्यात यावी. जर हा खदान उदयोग नसता, तर आपल्याला शेतीशिवाय जगण्याचा पर्याय नव्हता. जरी भारत कृषिप्रधान देश असला तरी सद्यस्थितीत शेती हा व्यवसाय घर व आयुष्य चालविण्यासाठी पुरक राहिलेला नाही. विविध उद्योग, खाणींमुळे रोजगार उपलब्ध झाला. | |
| ४) | त्यांनी सांगितले की सर्व खाणी बंद कराव्यात हा आमचा उद्देश नाही किंवा आम्ही कुठल्याही प्रकल्पाच्या विरोधात नाही. येथील सर्व युवक युवतींची इच्छा आहे की रोजगार मिळावा. जेणेकरुन त्यांचे संसार सुरु होतील. आमचे गाव सोडून आम्हांला बाहेर जायचे नाही. जर मुले परगावात गेले, तर आईवडिलांची काळजी कोण घेणार? पण खदान मालकांनी पर्यावरणविषयक जबाबदाऱ्या पार पाडल्याच पाहिजेत. आरोग्य व शिक्षणाची जबाबदारी पार | |

| | | |
|---|---|---|
| | पाडली पाहिजे. त्याचप्रमाणे खाणीतील रोजगाराच्या संधीसाठी अगोदर स्थानिकांना प्रशिक्षण देण्यात यावे. शासनाची जबाबदारी आहे की येथील परिसरातील रस्ते बांधून देण्यात यावे. | |

१८) <u>श्री अजय पांडुरंग ढोबे, जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, जिल्हा यवतमाळ:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बैठकीत मान्यवरांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिल्याशिवाय ही जनसुनावणी बंद करु नये. गेल्या ३० वर्षात मोहदा गावात ज्या २२ खाणी कार्यरत आहेत, खाणमालकांमुळे, प्रशासनाच्या चुकीच्या धोरणामुळे, जे काही लोक या अपघातात मृत्युमुखी पावले, त्या सर्वांचेच आपण गुन्हेगार आहोत. आम्ही प्रशासनाला वारंवार विनंती करतो की २०१९ मध्ये मोहदा गावातील ग्रामस्थांनी व येथील पर्यावरण समितीने पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना येथील सर्व खाणींना भेट, सद्यस्थिती अहवाल तयार करुन त्यावर पुढील कारवाई करण्याची मागणी केलेली होती. त्यावर अद्यापपावेतो कुठलेही काम झालेले नाही | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की संबंधित सर्वेक्षण व त्यानंतर झालेली कार्यवाही याबाबत कळविण्यात येईल. |
| २) | तरीही आता नवीन खाणींसाठी जनसुनावणी ही शासनाने आयोजित केलेली आहे. ही जनसुनावणी ही अवैध आहे. तर ती प्रथम रद्द झाली पाहिजे. कार्यरत खाणींच्यामुळे गावक-यांना ज्या समस्या आहेत, त्याचे प्रथम निवारण केले पाहिजे. शासनाने याबाबत कडक धोरण आखून स्थानिकांच्या सर्व समस्यांचे निवारण केले पाहिजे. नंतर नवीन खाणींबाबत विचार | |

| | | |
|---|---|---|
| | केला पाहिजे. गावातील लोकांना रोजगार, बेरोजगार याबाबत चर्चा झालेली आहे. आमची तीच मागणी आहे. कौशल्य विकासाबाबत प्रशिक्षण हे दिलेच पाहिजे. स्थानिक मूळ शेतकऱ्याची खाणीसाठी जमिनी घेण्यात येतात व त्यांचा मुलगा त्या प्रकल्पात कामगार किंवा वॉचमन म्हणून लागतो. जो मालक होता, तो तेथे नोकर म्हणून काम करतो. म्हणून मूळ शेतक-यांचाही खदान विकसित करताना विचार व्हायला पाहिजे. आम्ही माहिती अधिकारात माहिती मिळविलेली आहे, त्यानुसार गेले २० वर्षात या मोहदा गावाने ४०० कोटी रुपयांची रॉयल्टी शासनास मिळवून दिलेली असूनही या गावात चाळीस हजारांचेही काम झालेले नाही. तर आपण पर्यावरणाचे संरक्षण करुन एक माणूस म्हणून जगले पाहिजे. | |
| ३) | त्यांनी पुढे सांगितले की बऱ्याच वेळा मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ, खनिकर्म विभाग, यवतमाळ यांना गावात सामाजिक कामांसाठी विनंती केलेली आहे. तर खनिकर्म विभागाची बैठक होते, त्यावेळी आमचा मुद्दाच घेत नाहित. खनिकर्म विभाग सांगतो की तुमच्या गावाचा डीपीआर तयार करुन आणा. खाणीतून शासनास मिळणाऱ्या निधीतून जर खनिकर्म विभागास पगार मिळतात, तर त्यांनीच शासनाच्या संबंधित विभागाशी समन्वय साधून डीपीआर करणे आवश्यक आहे. आमची विनंती आहे की मप्रनि मंडळ, महसूल किंवा लेबर अधिकारी यांना एकत्रितपणे गावात मुक्काम करावा. जसे आएएस झाले की प्रशिक्षणासाठी देशात जातात, तसेच येथे यावे व येथील परिस्थितीचा अभ्यास करण्यात यावा. खाणीची खोली, | |

| | | |
|---|---|---|
| | खाणीभोवती तारांचे कुंपण याबाबत काहीच निर्णय होत नाही. | |
| ४) | त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की या खाणींमध्ये काम करणाऱ्या विविध संवर्गातील कामगारांना वेतन हे नियमाप्रमाणे मिळते काय याची माहिती शासनाच्या संबंधित विभागाने गोळा करुन बैठकीत उपलब्ध करणे अपेक्षित आहे. एखाद्या कामगाराचा कर्तव्य बजावताना जर अपघाती मृत्यु आला, तर त्याच्या कुटुंबाला काय मोबदला देण्यात येणार, त्या कामगाराच्या वारसाचे प्रकल्पात पुनर्वसन करणार का याची उत्तरे येथे अपेक्षित आहेत. त्याचप्रमाणे संबंधित सर्व कामगारांसाठी विमा कवच दिलेले आहे का व ते कोणते याची माहिती आवश्यक आहे. नंतरच नविन खाणींना परवानगी देण्यात यावी. | |
| ५) | त्यांनी परत मागणी केली की सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय ही जनसुनावणी बंद करु नये. प्रकल्पात १६०० कर्मचाऱ्यांची गरज आहे असे सांगितले. त्याची संपूर्ण माहीत हवी. | |
| ६) | त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की मप्रनि मंडळास प्रकल्पाविषयी तक्रार नोंदविल्यानंतर मप्रनि मंडळाकडून त्याची पाहणी करण्यात येते. पण पाहणी अहवाल व त्यावर केलेली पुढील कार्यवाही ही संबंधित तक्रारदाराला उपलब्ध करुन देण्यात येत नाही. | |

अध्यक्ष, पर्यावरणविषक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प सल्लागार यांना आतापर्यंत विचारण्यात आलेल्या प्रश्नांना जनतेसमोर उत्तरे देण्याची सूचना केली.

**<u>प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी बैठकीत उपस्थित केलेल्या सर्व प्रश्न, सूचना, आक्षेप यांना खालील प्रमाणे उत्तरे दिली</u>**

**१)** पहिला प्रश्न होता शंकरवारसाहेबांचा – दलितवस्ती अतिक्रमण. हा प्रश्न खाण असोशिएनचा असून त्याचे पदाधिकारी संबंधित प्रश्नाची उत्तरे देतील.

२) श्री राहूल तावडे यांनी प्रश्न विचारला की शेती लगत त्रास आहे. येथे मूळ संकल्पना आहे जसे की विजूभाऊ किंवा आशीश भाऊ बोलले की ही जी जनसुनावणी चालू आहे, ही क्लस्टरसाठी चालू आहे. दोन भागात दगडखाणींना पर्यावरण अनुमती मिळते. पहिली पर्यावरण अनुमती मिळते ती क्लस्टरला. ती घेण्याचे कारण छोट्या छोटया खाणमालकाला ते करणे शक्य नाही, कारण त्याचे छोटे छोटे पॉकेट्स आहेत. केंद्र सरकारने सांगितले की सर्वांची असोसिएशन बनवायची व मोठा कार्यक्रम राबवायचा जो क्लस्टव्दारे करण्यात येईल. शिवाय वैयक्तिक प्रत्येक खाणीस पर्यावरण अनुमती ही घ्यावीच लागणार आहे. म्हणजे येथे प्रथम क्लसटरची येईल व दुसरी ही वैयक्तिक त्या खदानची. सीएसआर व सीईआर हा फक्त असोशियनचा आहे. २.५ टक्के नफा व सीईआर हा वेगळा जाईल. आपण District Survey Report पाहीला तर त्यात तो नमुद केलेला आहे. प्रत्येक खाण तो वेगळा असेल. त्याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्या संकेतस्थळावर संपूर्ण माहीत आहे. प्रत्येक प्रकल्प प्रवर्तकांचा सीएसआर व सीईआर हा वेगळा राहिल.

३) नागेश विठ्ठल जुन्नरी, - शेतात डस्ट येते. वास येतो. स्फोट झाल्यानंतर वास येतो - येथे छोट्या छोट्या खाणी आहेत. तर योग्य पध्तीने समन्वय साधण्यासाठीच त्यासाठीच हा क्लस्टरचा प्रस्ताव तयार केलेला असून जनसुनावणी पध्दत स्विकारली आहे. बरेच खाणमालक हे वेगवेगळ्या प्रकारचे ब्लास्टिंग करतात. येथे असोशिएनतर्फे Control Delay Blasting केले जाईल. ते असोशिएनतर्फे राबविण्यात येईल व खाणमालक जो क्लस्टरचा सभासद आहे, त्यासही ते बंधनकारक राहील. असोशिएनतर्फे एक Regulatory Procedure ची अंमलबजावणी होईल. प्रत्येक खाणमालकाच्या त्याच्या वैयक्तिक पर्यावरण अनुमतीसाठी (Individual Environment Clearance) सुध्दा ती अट राहिल.

४) श्री सचिन वासीकर, उप सरपंच, मोहदा - १०% हा शासनाशी निगडीत आहे. खाणधारक व असोशिएशन रॉयल्टीवर डिएमएफ देतच आहे.

५) **श्री खलील शेख, मोहदा यांनी मुरुम, दगडांची पूर्तता करावी, पर्यावरण सल्लागार यांनी करण्यास हरकत नाही असे मत मांडले. त्यांनी असोशिएनचे अध्यक्ष यांना उत्तर देण्यास सांगितले.**

श्री राजूरकर यांनी सांगितले की शेतालगतच्या रस्त्याबाबत प्रश्न विचारण्यात आलेला आहे. पूर्वीसुध्दा जे पाणंद रस्ते आहेत, ज्याज्यावेळी शेतक-यांनी, त्या गावच्या सरपंचांनी पाणंद रस्त्यावर मुरुम टाकण्याची मागणी केली, त्या त्या वेळी खाण मालकांनी मुरुम उपलब्ध करुन दिला व पसरून दिलेला आहे. त्यामुळे मुरुम टाकून देणे हा प्रश्न गौण आहे. भविष्यात जेव्हा गरज असेल, तेव्हा मागणी केल्यास निश्तिच त्याप्रमाणे मुरुम उपलब्ध करुन देण्यात येईल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक यांनी त्याबाबत आश्वासन दिलेले आहे.

यावेळी काही उपस्थितांनी केव्हाही दिला नाही असा गलका केला.. श्री राजुरकर यांनी सांगितले नाही टाकला हे म्हणणे चुकीचे आहे. दिला असल्यास त्याची पुरावा देण्यात यावा अशी मागणी उपस्थितांनी केली. त्यावेळी श्री राजुरकर यांनी सांगितले की स्थानिक प्रशासनाने जिथे टाकण्यास सांगितले, त्याठिकाणी टाकलेला आहे. जर आपणास याबाबत खुलासा पाहिजे असल्यास स्थानिक प्रशासन याबाबत खुलासा करतील. यावेळेस उपस्थितांनी नकारात्मक प्रतिक्रिया दिली असता पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की यासाठीच असोसिएशन स्थापन करण्यात आलेले असून सर्व वैधानिक नियमांचे पालन करता येईल.

६) **श्री किशोर शंकावार, - गावातील पिण्याच्या पाण्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे. आर.ओ. पाणी तरतुद असोशिएनतर्फे करण्याचा प्रस्ताव आहे.**

७) **श्री विधाते ऑनलाईन प्रश्न होता मॉइन्स क्लोझरविषयी**. १२ जानेवारी, २०१८ चे महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार ज्या मायनर मिनर्लसच्या खाणी आहेत, त्या पाणी साठवण करण्यासाठी तलाव करण्यात यावा. तशी उपाययोजना करण्यात यावी. त्याचप्रमाणे शेवटचा मायनिंग क्लोझर प्लॅन हा [संचालक, भूगर्भशास्त्र (खाण) Director, Geology Mining] यांच्याकडून मायनिंग क्लोझर प्लॅन मंजूर करण्यात यावा. उपाययोजना करुन त्याचा अहवाल जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना सादर करण्यात यावा. आपल्याकडे गट नं. ७५ हा सरकारी गट आहे. तेथे खाणमालकांचा प्रत्यक्षात सहभाग नाही. तर जेथे मिनरल मॉइन्स आहेत, तेथे फायनल क्लोझर प्लॅन/ शेवटचा मायनिंग क्लोझर प्लॅन हा [संचालक, भूगर्भशास्त्र (खाण) Director, Geology Mining] हा संचालक, यांच्याकडून मंजूर करण्यात येईल.

**त्यांनी सांगितले की जेथे** फायनल क्लोझर प्लॅन/ शेवटचा मायनिंग क्लोझर प्लॅन आहे, तेथे वॉटर सम्प तयार करुन
[संचालक, भूगर्भशास्त्र (खाण) Director, Geology Mining] यांच्याकडून मायनिंग क्लोझर प्लॅन मंजूर करण्यात येईल.

श्री विधाते यांनी मत्स्यव्यवसायाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तर आम्ही नियोजन करताना विचार केला की तेथे मोठी शासकीय बंद झालेली खाण आहे. तर तेथे मत्स्यव्यवसायाची व्यवस्था अवलंबिण्यात येऊ शकते. येथे मत्स्यव्यवसायाचे प्रशिक्षण हा विचार केलेला असून त्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे. प्रत्येक खाणीचा जो सीईआर निधी आहे, त्यातून हा खर्च करता येणार आहे. असोसिएशन ही जनजागृती करेल, तर वैयक्तिक खाणी निधी शासन नियमाप्रमाणे जिल्ह्याला दिलेला आहे.

याठिकाणी **श्री रविंद्र पुसाटे, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ** यांनी मत मांडले की आम्हांला फिश नको, आम्हांला रोजगार हवा आहे.

**श्री विधाते यांनी वृक्ष लागवडीबाबत प्रश्न विचारलेला होता. तर असोशिएशनकडून ७५०० झाडांचे प्रतिवर्ष उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे.** रस्त्याला लागून (Avenue Plantation) करण्यात येईल.

८) श्री आशिष फुलसंगे यांचे प्रश्न होते- रस्ते परिस्थितीवर. हा विषय डिएमएफ मधून सोडविता येऊ शकतो. अध्यक्ष, क्रशर असोशिएशन हासुध्दा विषय सोडवतील. यावेळी श्री फुलसंगे यांनी आक्षेप नोंदविला की क्रशर असोशिएशनच्या अध्यक्षांनी सांगितले तर डिएमएफ निधी मिळत नसतो.

त्यावेळी श्री राजुरकर यांनी माहिती दिली की श्री फुलसंगे यांनी मांडलेल्या विचारांनुसार राज्य रस्ते हे डीएमएफ निधींतर्गत घेता येत नाही. या भागातील आमदार यांच्याची या विषयावर बऱ्याचवेळा चर्चा झालेली असून केंद्र सरकारकडून आलेला निधी व राज्य सरकारकडून आलेला निधी यातून रस्ता विकसित करता येतो. येथील खासदारांशी चर्चा झाली आणि जर रस्ते होत नसतील तर आंदोलन करावे लागले असे त्यांचे मत पडले. त्यावेळी श्री फुलसंगे यांनी मत मांडले येथील सामान्य नागरिकांना त्यामुळे प्रचंड त्रास होत आहे. मुकुटबन येथील शाळेची बस बंद पडलेली आहे. त्यावेळी श्री फुलसंगे यांनी मागणी केली की जोपर्यंत हे रस्ते होत नाहीत, तोपर्यंत सर्व खाणी ह्या बंद करण्यात याव्यात. श्री राजुरकर यांनी माहिती दिली मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना एक प्रतिनिधी मायनर मिनरलमधून घ्यावा अशी मागणी केलेली होती. त्यामुळे मोहदा गावाला काही शासकीय निधी आणता आला असता. पण मा. जिल्हाधिकारी यांनी ही मागणी फेटाळली आणि दोन्ही प्रतिनिधी हे मेजर मिनरल संवर्गातून घेतले. श्री फुलसंगे यांनी मत मांडले की जर आंदोलन करावे लागत असेल, तर ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी व रस्ते चांगले झाल्यानंतर परत सहा महिन्यांनी घेण्यात यावी.

श्री फुलसुंगे यांनी मागणी केली की येथेच मा. जिल्हाधिकारी यांना येथे निवेदन देऊ. आठ दिवसात काही झाले नाही तर आंदोलन सुरु करु, तोपर्यंत सर्व खदानी बंद ठेवण्यात याव्यात. रस्ते दुरुस्त झाल्यानंतरच खाणी चालू करण्यात याव्यात.

यावेळी ऑनलाईन उपस्थित असलेले श्री विधाते यांनी आक्षेप नोंदवत असे सांगितले की ही जनसुनावणी शासकीय आहे. मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चालू आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेमध्ये आंदोलन करणे याचे प्रावधान नाही. तरीही संबंधित अधिका-याने आंदोलन करणे हे शब्द मागे घेण्यात यावा. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी ऑनलाईन उपस्थित श्री विधाते यांना व बैठकीतील सर्वांना सांगितले की आंदोलन करावे लागेल हे शब्द पर्यावरणविषयक समितीने किंवा उपस्थित शासकीय अधिका-यांनी उच्चारलेले नाहीत. बैठकीत उपस्थित स्थानिक व्यक्ती, पर्यावरण सल्लागार आणि प्रकल्प प्रवर्तक म्हणजे अध्यक्ष, मोहदा दगडखाण सामुहिक संघटना यांच्यातील संवाद आहे. आयोजक यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना आंदोलन करु हा शब्द मागे घेण्यास सांगितले. श्री राजुरकर अध्यक्ष, मोहदा दगडखाण सामुहिक संघटना यांनी आंदोलन करु हा शब्द मागे घेतला.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की स्थानिक रोजगाराबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आलेला होता. तर प्रस्तावित प्रकल्पात १६०० व्यक्तींना रोजगार मिळू शकतो, त्यातील २०० व्यक्ती ही कुशल संवर्गातील लागतील. श्री फुलसंगे यांनी विचारणा केली की आपण किती रोजगार देणार आहात आणि सध्या कार्यरत प्रकल्पात किती लोक काम करत आहेत? प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पात ४०% कुशल आणि ६०% अकुशल आहेत. श्री फुलसंगे यांनी किती कुशल व अकुशल कर्मचारी आहेत त्याचे आकडे देण्यास सांगितले. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ३५०-४०० अकुशल आहेत, तर १२५-१५० च्या आसपास कुशल मजूर काम करतात. श्री फुलसंगे यांनी पुढे विचारले की यात स्थानिक मोहद्याचे किती व वेळावे व टुंड्रा यातील किती आहेत? प्रकल्प प्रवर्तक यांनी ७०-८० मोहद्याचे कामगार हे उत्तर दिल्यानंतर बैठकीत स्थानिकांना एकच गलका करत नाही नाही असे ओरडण्यास सुरवात केली.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना कार्यरत कामगारांची नावनिहाय व गावनिहाय यादी, स्थानिक, बाहेरिल किती ते प्रत्येक ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देतील अशी सूचना केली. त्यावेळी चर्चेनंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना कार्यरत कामगारांबरोबरच प्रस्तावित प्रकल्पात किती अकुशल,अर्धकुशल, कुशल संवर्गातील पदे व प्रस्तावित नियुक्त्यांची वर्गावारी याची वेगळी यादी सर्व ग्रामपंचायत कार्यालयास उपलब्ध करण्याची सूचना केली.

त्यावेळी श्री फुलसंगे यांनी मागणी केली बाहेरिल जिल्ह्यातील व बाहेरिल राज्यातील कामगारांचा चारित्र्याचा दाखला (character certificate) घेण्यात यावा व त्याची माहिती येथील संबंधित पोलिस चौकीस कळविण्यात यावी अशी मागणी करण्यात येते. कारण या कुठल्याच खाणीतील कामगारांचा तसा स्थानिक/संबंधित पोलिस चौकीत अहवाल नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधित सूचनेचे स्वागत करुन सदरहू सूचना रास्त असून प्रकल्प प्रवर्तकांनी त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सूचना मान्य असून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

पर्यावरण सल्लागार यांनी स्थानिकांना प्रशिक्षण देण्याबाबत सूचना उपस्थित करण्यात आल्या. तर Vocational Training Centre जे DGMS आहे, त्यासोबत समन्वय साधून प्रशिक्षण राबवू शकतो. याबाबत असोशिएशन निश्चितच पुढाकार घेईल. श्री फुलसंगे यांनी धोरण ठरविण्यासाठी किती दिवस लागतील याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी कमीतकमी चार महिन्याचा कालावधी लागेल असे सांगितले.

पुढील प्रश्न होता की मप्रनि मंडळास तक्रार केल्यानंतर पाहणी अहवाल व पुढील कार्यवाही याबाबत संबंधित तक्रारदारांना कळविण्यात येत नाही. याबाबत मप्रनि मंडळ उत्तर देईल.

पर्यावरण सल्लागार यांनी श्री विजूभाऊ पिदूरकर यांच्या लेखी आक्षेपांना उत्तर देताना सांगितले की एकूण क्षेत्र ९९.९९ हेक्टर असून क्लस्टरचे क्षेत्र ६७.५८ हेक्टर आहे. काही बंद खाणी आहेत. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या १ जुलै २०१६ च्या अधिसूचनेनुसार बंद खाणी व १ जुलै, २०१६ पर्यंत ज्यांना पर्यावरण अनुमती प्रदान करण्यात आली, त्यांचे क्षेत्र क्लस्टरमध्ये धरण्यात येऊ नये. त्यामुळे क्षेत्रफळाची तफावत दिसते व राहणार आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी श्री पिदूरकर यांना आकडेवारीतील फरकांबाबत उत्तर देताना सांगितले की ज्याप्रमाणे प्रत्येक खाणीचा वैयक्तिक मायनिंग योजना असते, त्याचप्रमाणे क्लस्टरचाही प्रादेशिक मायनिंग योजना आहे. संचालक, भूगर्भशास्त्र (खाणी) यांनी मंजूर केलेला मायनिंग प्लॅन उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यांनी ईआयए व इतर ठिकाणी काही त्रुटी असल्यास त्या योग्यप्रकारे दुरुस्त करण्यात येतील असे सांगितले. यावेळी अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांना अहवालात जो बदल करणार, तो सामान्य जनतेस समजेल असा बदल करायचा असेल तर तो करण्यात यावा.

श्री पिदूरकर यांनी आक्षेप नोंदविला की ईआयए मध्ये प्रत्येकाचे भांडवल वेगळे दाखविले आहे. भांडवलाबाबत उत्तर देताना पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की क्लस्टरला भांडवल गुंतवणूक म्हणजे पर्यावरण व्यवस्थापन योजना (ईएमपी), पण एकत्रित जबाबदारीसाठी अंदाजपत्रक हे असोशिएनकडे येईल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की मायनर मिनलर्ससाठी नियम नव्हते. आता अस्तित्वात आलेले आहेत. प्रत्येक खाणीस डीएसआर – District Survey Report महत्वाचा आहे. यावरच जिल्ह्याची खनिजांचे धोरण ठरते. त्यांनी सीईआरबाबतील धोरणांचे स्पष्टीकरण केले. त्यांनी सांगितले की जर भांडवली गुंतवणूक ही कमी असली, तरी त्यांना विशिष्ट रक्कम निर्धारित केली. त्यानुसार ७५०० झाडे लावण्याची जबाबदारी ही असोशिएनची असणार आहे. मात्र वैयक्तिक पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यावर ७.५ मीटर्सच्या अंतरावर किंवा इतर ठिकाणी वृक्षारोपणाची जबाबदारी ही त्या खाणमालकांची राहिल. श्री पिदूरकर यांनी वृक्षारोपणाबाबत आक्षेप नोंदविल्यानंतर पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की ज्या चार खाणी बंद आहेत, त्यापैकी तीन खाणी ह्या सरकारी आहेत, त्यामुळे असोशिएशन त्याबाबत काहीच करु शकत नाही.

श्री पिदूरकर यांनी आक्षेप नोंदविला का आतापर्यंत या खाणींवर किती झाडे लावली व त्यांची रुंदी व उंची किती आहे याची फक्त माहिती देण्यात यावी. पर्यावरण

सल्लागार यांनी सांगितले निर्देशांप्रमाणे २-४ वर्षांची झाडे व त्यांची उंची ५-६ फूट एवढीच ठेवायची आहे. येथे फक्त क्लस्टरबाबत बोलत आहोत.

श्री पिदूरकर यांनी परत आक्षेप नोंदविताना सांगीतले की ७५०० झाडे जगण्याची आपण हमी देणार आहेत काय? पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की दगडाच्या खाणीत झाडे लावण्याचा दर हा ७०% असतो. याठिकाणी ७५०० झाडात ७०% जगतील व दरवर्षी ३०% नवीन लावावी लागतील. त्याचप्रमाणे आपण रस्त्याच्या कडेनही झाडे लावणार आहोत. त्याचप्रमाणे सार्वजनिक ठिकाणे, बांधा येथे लावणार आहोत, कारण तेथे झाडे जगण्याचाच दर हा कमी असतो.

श्री पिदूरकर यांनी अस्तित्वात असलेल्या (बंद व कार्यरत) यांच्या झाडांची आकडेवारी यादी उपलब्ध करण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की वनविभागाने प्रमाणित केलेली यादी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**श्री अजय पांडुरंग ढोबे, जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, यवतमाळ जिल्हाः- यवतमाळ** यांनी विचारणा केली की मोहदा गावक-यांनी मप्रनि मंडळाकडे ०२/११/२०१८ रोजी कार्यरत खाणीतील हवा प्रदूषणाबाबत तक्रार केलेली होती. मप्रनि मंडळाने दिनांक २४/०१/२०१९ रोजी त्याबाबत सर्वेक्षण केलेल होते. त्यांनतर उप प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर यांनी ०४/०२/२०१९ रोजी प्रत्येक खाणधारकांना निर्देश जारी केले. त्याची पूर्तता झालेली आहे काय?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की संबंधित सर्वेक्षण व त्यानंतर झालेली कार्यवाही याबाबत कळविण्यात येईल.

**यावेळी श्री अजय पांडुरंग ढोबे** यांनी सूचना केली की जोपर्यंत मप्रनि मंडळाकडून ०४/०२/२०१९ चा अहवाल प्राप्त होत नाही, तोपर्यंत ही जनसुनावणी ही पुढे ढकलण्यात यावी, कारण त्या निर्देशांची जर अजूनही पूर्तता झालेली नसेल, तर आताची कशी करणार? आयोजक यांनी सांगितले की आपल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी चूक मान्य करुन सांगितले की प्रति हेक्टर नसून प्रति एकर आहे. श्री पिदूरकर यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस निवेदन केले की शेतीच्या संदर्भात शास्त्रीय, वैज्ञानिक पध्दतीने जी काही कार्यपध्दती शासनाची आहे, त्यानुसारच ईआयए अहवाल तयार करण्यात यावा. पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की हा प्रारुप अहवाल असून जनसुनावणीनंतर अंतिम अहवाल तयार करण्यात येईल.

येथे अध्यक्ष यांनी ज्या त्रुटी असतील, त्या दुरुस्त करण्याच्या सूचना दिल्या.

श्री पिदूरकर यांनी मागणी केली की खाण उद्योगात ज्या मिशनरी लागतात, त्याचे प्रशिक्षण येथील स्थानिक युवकांना देण्यात यावे. रोजगाराच्या प्रशिक्षणाबाबत ईआयएमध्ये उल्लेख नाही.

श्री पिदूरकर यांनी सीएसआर बाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सीएसआर हा प्रत्येक खाणीचा फायदा झाल्यानंतरच त्याच्या २% ठरविता येईल, येथे क्लस्टरचा विचार करुन सीएसआर सांगितला.

श्री पिदूरकर यांनी खनिकर्म अधिका-यांना प्रश्न विचारला की नवीन धोरणानुसार ५ कि.मी.ची यादी बनविल्या का व त्यात मोहदाचे नांव आहे का? खनिकर्म नियम, १९५७ व वेळोवेळी सुधारित अधिसूचनेनुसार निधी वाटप समितीसाठी केंद्र सरकारने जिल्हाधिकारी यांनी अध्यक्ष केलेले आहे. २०१९ च्या केंद्र व राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार ५ कि.मी. गावांची यादी केलेली आहे काय?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जिल्हाधिकारी यांच्या वतीने उत्तर दिले की आपण उपस्थित केलेल्या सर्व अधिसूचनांचा, शासन निर्णयाप्रमाणे पाच कि.मी. अंतरावरिल गावांची यादी आपणास लेखी स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी आपण आपले लेखी निवेदन खनिकर्म अधिकाऱ्यांना सादर करण्यात यावे.

यावेळी श्री पिदूरकर यांनी मत व्यक्त केले की याठिकाणी मोठे वाचनालय, व्यायामशाळा हव्यात. येथे रॉयल्टीचा परतावा शून्य आहे. आपण सिंगापूरच्या पुढेही मोहदा गाव बनवू शकतो. तरी निधी न मिळणेबाबत स्पष्टीकरण अध्यक्षमहोदय यांनी दिल्यास आम्हांला न्याय मिळेल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जे सांगितल की जे काही डीएमएफ नियम आहेत, त्या सर्व बाबींविषयीची कार्यवाहीसाठी डीएमओ स्वतः वैयक्तिक लक्ष घालतील अशी मी ग्वाही देतो. त्यानुसार त्यांना कार्यवाहीच्या सूचना देण्यात येत आहेत.

१९)**श्री वामन मडावी, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ** यांनी त्यांचे प्रलंबित पैसे तीस हजार रुपये मिळत नाहीत याबाबत प्रश्न विचारला. संबंधित व्यक्तीस आठ दिवसात देण्याचे आश्वासन संबंधित क्लस्टर सभासदाने दिले. श्री मडावी म्हणाले मी स्थानिक असून मला साधे घर नाही. मात्र बाहेरून आलेल्यांना घरे बांधून मिळत आहेत. अध्यक्ष यांनी ग्रामपंचायतीचा मुद्दा येथे उपस्थित करु नये असे सांगितले.

श्री फुलसंगे यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी मुरुम टाकून दिल्याचे सांगितले. मात्र या ४ जुलैला टुंड्रात रस्ता दुरुस्तीसाठी आंदोलन झालेले आहे. अद्यापही एक गाडी मुरुम त्यांनी टाकून दिलेला नाही. म्हणून आपल्यासमोर हा मुद्दा वारंवार बोलत आहोत, जर आतापर्यंत केले नाही, तर भविष्यात हे काय करणार? तरी आमची मागणी आहे की ही जनसुनावणी ही चार महिने पुढे ढकलण्यात यावी. सर्व गोष्टींची पूर्तता केल्यानंतरच परत चार महिन्यांनी घेण्यात यावी.

२०) **श्री विजय मारुती ठवरी, सरपंच टुंड्रा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही ४ जुलैला रस्त्यासाठी आंदोलन केलेले होते. शाळेची बस येत नाही. खराब रस्त्यांवरुन ओव्हरलोड ट्रक्स जातात. त्यामुळे अपघात वाढले आहेत. आयोजक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना मुरुम टाकण्याबाबत माहिती देण्यास सांगितले. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की टुंड्रो-मोहदा रस्त्यासाठी चार दिवसांपूर्वी वणी उप अभियंतांशी चर्चा केली. त्यांनी मागणी केली की आम्हांला मुरुम द्या, आम्ही मशिनरी उपलब्ध करुन देतो. तर याबाबती मुरम उपलब्ध करुन देण्यात येईल व १-२ दिवसात त्याबाबत पुढील कार्यवाही होईल.<br>अध्यक्ष यांनी मुरुम उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिलेले आहे, तर आठ दिवसात ते पूर्ण करण्याची सूचना देण्यात येते. |

**श्री रविंद्र पुसाटे, मोहदा, ता. वणी, जि. यवतमाळ यांनी** अध्यक्षांना मागणी केली की येथे स्थानिक लोक आहेत, जिल्हाधिकारी आहेत व खाण मालक आहेत. तर आता आपण खाणीत जाऊन किती झाडे लावलेली आहेत ते तपासू. अध्यक्ष यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांना अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

अध्यक्ष यांनी ऑनलाईन उपस्थित असणा-या श्री विधाते यांच्या प्रश्नास उत्तर देण्यास सांगितले.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की जानेवारी, २०१८ च्या केंद्र सरकारच्या अधिसूचनेनुसार मायनर मिनरलसाठी खाण बंद करताना पाणी साठवण व्यवस्था/पॉन्ड करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे हा क्लोझर प्लॅन संचालक, भूगर्भविज्ञान (खाण) यांना सादर करावा लागतो व त्यांच्या जिल्हा खनीकर्म विभागाच्या देखरेखीखील खाण ही बंद करण्यात येते.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की मासेमारी प्रशिक्षणासाठी जी रक्कम दर्शिविली ती असोशियनच्या सीएसआर मधून देण्यात येईल. मात्र प्रत्येक खाणमालकांची सीएसआर हा वेगळा राहिल. येते वन्यजीव मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची गरज नाही. हरितपट्टा विकसनासाठी ५७०० झाडे प्रतिवर्ष प्रस्तापित केलेली आहेत. सुरक्षा क्षेत्र (Safety Zone) हा महाराष्ट्र मायनिंग कायद्यानुसार २०० मीटर्सचा आहे. तो कायद्यानुसार असल्याने ५०० मीटर्स करण्याची तरतुद नाही.

अध्यक्ष, यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीत लेखी निवेदने प्राप्त झालेली असून ती स्थानिक मप्रनि मंडळास हंस्तातरित करण्यात येत असून त्यास संबंधितांना लेखी स्वरुपात

उत्तरे पाठविण्याची सूचना देण्यात येते. सदरहू लेखी निवदने अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की जनतेचा प्रकल्पाला, विकासाला विरोध नाही. मात्र त्यांच्या मूलभूत गरजा (Basic Needs) पूर्ण मिळाव्यात अशी अपेक्षा आहे, म्हणजे पिण्याचे पाणी, चांगले रस्ते, वैदकीय सुविधा, शिक्षणाच्या सोयी. त्या मिळत नसतील तर ते त्यांची नाराजी समजून घेणे गरजेचे आहे. यासाठी प्रकल्प प्रवर्तकांकडून सहकार्य अपेक्षित आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले २३ सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(अतुल सातफळे)** | **(अ. मा. करे)** | **(ललितकुमार वऱ्हाडे)** |
| समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ |